MHAU060025662023

# नियमित दिवाणी दावा क्र. ५७७/२०२३ मधील नि. १० वरील आदेश

१. प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादी यांचेविरुध्द दावा मिळकतीची सरकारी मोजणी होवुन अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. **वादींचे कथन थोडक्यात असे की,**

वादीचे कथन की मौजे वाकद ता. कन्नड, जि. औरंगाबाद चे शिवेतील शेतजमीन गट क्र. ७० ज्याचे एकूण क्षेत्रफळ ०३ हे. ०५ आर पैकी वादीचे मालकीचे क्षेत्र ०० हे. ४३ आर यासी आकार ७ रू. ५३ पैसे व त्याची चतुःसिमा :– पुर्वेस :– विष्णु केशव दाशरथे यांची शेतजमीन पश्चिमेस – गट क्र. ४८० मधील संमीद्राबाई रघुनाथ नवघरे, संतोष रघुनाथ नवघरे, राजु रघुनाथ नवघरे, सविता कैलास थोरात, कविता दत्तु वाघ तसेच गट क्र. ४८१ मधील रामेश्वर नाना नवघरे व कृष्णा नाना नवघरे यांचे शेतजमीनी दक्षिणेस :–प्रतिवादी काशिनाथ भिका नवघरे यांची शेतजमीन व उत्तरेस –योगेश सुर्यभान बोराडे यांची याच गट क्र. ७० मधील शेतजमीन येणेप्रमाणे असलेली चतुःसिमाबध्द असलेली शेतजमीन मिळकत यात वादी यांची ०० हे ४३ आर या मिळकतीपैकी वादींनी नमुद केलेल्या मिळकतीचे दक्षिणेकडील–पुर्व–पश्चिम बांध फोडुन प्रतिवादींनी बेकायदेशिरपणे केलेले अतिक्रमीत वादीचे शेतजमीन मिळकत क्षेत्र अंदाजे ०.०९ आर शेतजमीन (सदर ०.०९ आर या मिळकतीस यापुढे दावा मिळकत/वादग्रस्त

मिळकत म्हणुन संबोधित केले आहे ).

३. वादीचे नमुद कलम १ मध्ये नमुद केलेल्या शेतजमीनीत वादी हिचे गरीब विधवा व दुबळे स्वभाव असलेने, तसेच तिचे एकटेपणाचा प्रतिवादी यांनी गैरफायदा घेऊन प्रतिवादी यांनी सदर मिळकतीचे दक्षिणेकडील बांधालगत पुर्व –पश्चिम असलेला सामाईक बांध फोडुन दिनांक १०.०५.२०२३ रोजी शेत नांगरणीचे वेळेस बेकायदेशीरपणे अंदाजे ०.०९ आर एवढ्या वादींच्या शेतजमीनीवर बेकायदेशिरपणे अतिक्रमण करून कब्जा केला आहे.

४. वादी यांचे म्हणणेप्रमाणे वादग्रस्त मिळकतीची सत्य परिस्थिती कोर्टासमोर येणे गरजेचे असुन मे. कोर्टाने मा.तालुका निरीक्षक भुमी अभिलेख, कन्नड यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करुन वादग्रस्त मिळकत मौजे वाकद ता. कन्नड, जि. औरंगाबाद चे शिवेतील शेतजमीन गट क्र. ७० ज्याचे एकूण क्षेत्रफळ ०३ हे. ०५ आर या संपुर्ण गटामधील असलेले वादी यांचे मालकीचे दावा कलम १ मध्ये नमुद केलेले चतु:सिमाबद्ध आसलेले क्षेत्राची हद्द कायम करणे साठी तसेच प्रतिवादी अथवा इतरांनी वादग्रस्त मिळकतीवर निश्चित किती क्षेत्रावर अतिकमण केले आहे, याची सविस्तर चौकशी करून त्याचा अहवाल कोर्टासमोर येणेकामी कोर्ट कमिशनर यांची नेमणुक होणे गरजेचे आहे व त्यासाठी प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाखल केला आहे. वादी यांचे गट क्र. ७० मधील वादींचे व इतर सहहिस्सेदारांचे क्षेत्राची मोजणी करण्यात यावी तसेच वादी क्र. १ ते ४ यांचे मालकीचे क्षेत्राचे हद्दीच्या खुणा कायम करण्यात याव्या.

५. प्रतिवादी हे प्रस्तुत दाव्यात हजर होउन देखील त्यांनी विहीत मुदतीत कैफियत दाखल न केल्याने त्यांच्याविरुध्द विना कैफियत आदेश पारीत

करण्यात आला.

६. प्रस्तुत अर्जासाठी वादी यांचे विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्यात दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

७. वादींच्या दाव्याचे अवलोकन करता, वादींनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांनी वादींच्या मौजे वाकद ता. कन्नड, जि. औरंगाबाद चे शिवेतील शेतजमीन गट क्र. ७० ज्याचे एकूण क्षेत्रफळ ०३ हे. ०५ आर यापैकी वादी यांची ०० हे ४३ आर या मिळकतीपैकी वादींनी नमुद केलेल्या मिळकतीचे दक्षिणेकडील–पुर्व–पश्चिम बांध फोडुन प्रतिवादींनी बेकायदेशिरपणे केलेले अतिक्रमीत वादीचे शेतजमीन मिळकत क्षेत्र अंदाजे ०.०९ आर या अतिक्रमित क्षेत्राचा प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. तसेच सदर अर्ज देवून कोर्ट तालुका उपअधिक्षक भुमी अभिलेख, कन्नड यांचेमार्फत वादी यांचे गट क्र. ७० मधील वादींचे व इतर सहहिस्सेदारांचे क्षेत्राची जमिनीची मोजणी करुन बांधाच्या हद्दी व खुणा ठरवुन त्या कायम करुन मिळणेकामी तालुका उपअधिक्षक भुमी अभिलेख, कन्नड यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करुन मागितली आहे.

८. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम १३६ प्रमाणे, गट क्रमांक व त्याच्या पोटहिश्याच्या हद्दीखुणा दर्शविण्याचे अधिकार फक्त जिल्हाधिकारी यांना असून तसे अधिकार दिवाणी न्यायालयास नाहीत. तसेच सदर संहितेच्या कलम १३८ प्रमाणे जिल्हाधिकारी यांनी कलम १३६ प्रमाणे दर्शविलेले गट क्रमांक व पोटहिश्याच्या हद्दीखुणा या निर्णायक ठरविण्यात आलेल्या आहेत.

९. वर अगोदरच नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम १३६ प्रमाणे गटक्रमांक व त्यातील पोटहिश्यांच्या हद्दीच्या खुणा

दर्शविण्याचे अधिकार केवळ जिल्हाधिकारी यांना असल्यामुळे या दाव्यातील दावा मिळकतीच्या हद्दीखुणा दर्शविण्यासाठी हद्द कायम मोजणी करण्यासाठी या न्यायालयास तालुका उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कन्नड यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करता येणार नाही.

१०. प्रस्तुत अर्जामध्ये वादीने प्र.वादी यांनी त्यांच्या जमीनीमध्ये अतिक्रमण केलेले असून ते अतिक्रमित क्षेत्र निश्चित होऊन मिळण्यासाठी तालुका उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कन्नड यांची दावा मिळकत मोजणी करण्यासाठी न्यायालय आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात यावी यासाठी विनंती केली आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादीने त्यांच्या जमीनीमध्ये अतिक्रमण केलेले आहे. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे केवळ दावा मिळकतीची मोजणी करुन मागितली आहे. सबब, मौजे वाकद, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथील शेतजमिन मिळकत वादी यांचे गट क्र. ७० मधील वादींचे व इतर सह–हिस्सेदारांचे क्षेत्राची मोजणी करणे अत्यावश्यक व क्रमप्राप्त आहे.

११. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ०९ च्या तरतुदीप्रमाणे वादग्रस्त बाबींवर अधिक प्रकाश टाकण्यासाठी योग्य व्यक्तीची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्याचे अधिकार न्यायालयास आहेत. प्रस्तुत दाव्यातील वादीच्या कथनाचा विचार करता, दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्यात आले आहे किंवा कसे, हे दर्शविण्यासाठी मोजणी विषयातील तज्ञ म्हणजेच तालुका उपअधिक्षक भुमी अभिलेख, कन्नड यांची दावा मिळकतीमध्ये मोजणी करण्यासाठी नियुक्ती करणे न्यायोचित ठरेल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**: <u>आदेश</u> :**

| | |
|---|---|
| १ | निशाणी क्र. १० चा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| २ | तालुका उपअधिक्षक भुमी अभिलेख, कन्नड यांची मौजे वाकद ता. कन्नड, जि. औरंगाबाद चे शिवेतील शेतजमीन गट क्र. ७० ज्याचे एकूण क्षेत्रफळ ०३ हे. ०५ आर मधील वादींचे व इतर सहहिस्सेदारांचे क्षेत्राची मोजणी नियम पुस्तिकेच्या तरतुदींच्या आधीन राहून, मोजणी करण्यासाठी न्यायालय आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. |
| ३ | तालुका उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कन्नड यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी, मौजे वाकद, ता. कन्नड, जि. औरंगाबादचे शिवेतील शेतजमीन गट क्र. ७० ज्याचे एकूण क्षेत्रफळ ०३ हे. ०५ आर क्षेत्रामध्ये दावा मिळकतीत लगत कब्जेदारांनी जर अतिक्रमण केले असेल तर ते अतिक्रमण मोजणी नकाशामध्ये स्पष्टपणे दर्शवावे व तसा नकाशा व अहवाल या न्यायालयात सादर करावा. |
| ४ | तालुका उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कन्नड यांना दावा मिळकतीमधील अतिक्रमण दर्शविण्यासाठी लगत गटाची मोजणी करणे आवश्यक असल्यास त्यांना तशी परवानगी देण्यात येत आहे. |
| ५ | तालुका उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कन्नड यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी मोजणी करुन त्यांचा अहवाल व नकाशा त्यांच्या कार्यालयात शुल्क जमा झाल्यानंतर ३ महिन्याच्या आत या न्यायालयात सादर करावा. |
| ६ | वादीला आदेशित करण्यात येते की, त्यांनी या आदेशापासून १५ दिवसांच्या आत, न्यायालय आयुक्तांचे मोजणीचे शुल्क हे परस्पररित्या |

| | |
|---|---|
| | टी. आय. एल. आर, कन्नड यांचे कार्यालयात जमा करावे व त्या पावतीची छायांकित प्रत न चुकता या न्यायालयात दाखल करावी. |
| ७ | या आदेशामध्ये नमूद केलेली मोजणी ही फाळणी मोजणी अथवा हद्द कायम मोजणी नाही हे स्पष्ट करण्यात येत आहे. |
| ८ | सदरचा आदेश हा न्यायालय आयुक्त यांना कळविण्यात यावा. |

RUPALI SURESHCHANDRAJI TAPADIYA

Digitally signed by RUPALI SURESHCHANDRAJI TAPADIYA
Date: 2025.07.09 17:18:55 +0530

**(सौ. आर.एस.तापडीया )**

**दिनांकः ०९.०७.२०२५**

**सह दि.न्यायाधीश क.स्तर,**

**कन्नड**